# तें आठवें आतां पुन्हां



(मदिरेपरी वाटे हवासा गोडवा झाला जुना
भेटीतुटी आशा- उमेदी आठवे आता पुन्हां)

(ऐन तारुण्यांतील इष्काच्या स्मृति पुन्हा जागृत झाल्या आहेत. तें धुंद जीवन पुन्हा जगावेंसें वाटूं लागलें आहे. फुलांनी बहरलेलीं तीं उद्यानें, त्या रसिल्या मंफली, त्या गांठी भेटी, ती अटीतटी, मदिरेनें धुंद झालेल्या नेत्रांनीं मदिराक्षीला तासन् तास न्याहाळणें, तिच्या जुलमांनीं हृदयाचे तुकडे तुकडे होणें, ते बदामी नेत्र, तें प्रेमपत्र, ती प्रतीक्षा, ती उपेक्षा या साऱ्या गोष्टी आठवत असून, पुन्हा त्याची अभिलाषा मनांत उसळली आहे. अशा अवस्थेत रचलेली ही एक अतिशय सुंदर गझल आहे. तींत वारंवार वापरलेला 'फिर् (पुन्हा)' हा शब्द किती सूचक आहे.! त्यानें ही करुण आणीव वारंवार सूचित केली आहे. कीं, "ते हि नो दिवसा गताः। गेले ते नवयौवनाचे चंदेरी दिवस; आतां उरल्या आहेत केवळ त्यांच्या आठवणी!"..... विसवृत्ति शक्य तितक्या कोमल करून वाचा- या गजलचा हा भावानुसारी रसाळ रमणीय अनुवाद.)

मुद्दत हुई है यार को मेहमाँ किये हुये
जोशे कदहसे बज्मे चरागाँ किये हुये

किति काळ झाला त्या दिनीं आलीस तू गे पाहुणी
सुस्वागता सजली सखे ! उत्साह ये ओसंडुनी
रतनार मदिरापात्र तें आरास मादक लोचनीं
मद्यांत मंफल रंगली ती याद ये अजुनी जुनी

करता हूं जमा फिर जिगरे लख्त-लख्त को
मुद्दत हुई है दावते मिजगाँ किये हुये

झाले किती दिन मी दिले तेव्हां तुला आमंत्रण
नजरेतुनी फिरल्या कशा या काळजावर कर्तती
निर्दये! विच्छिन्न हृदया घेऊं दे मज सांधुनी
धुंदीत फिरुनी चालवी हृदयावरी दृग्संगिनी

फिर् वजे एहतियात्से रुकने लगा है दम
बर्सों हुये हैं चाके गरेबाँ किये हुये

प्रेमवेडाच्या भरी मी फाडिली वसने किती!
तोच येई लहर फिरुनी श्वास राही कोंडुनी
ती पुन्हां येणार कळतां आवरेना भावना
ने ओढुनी गतजीवनीं ती कल्पना उन्मादिनी

फिर् गर्मे नाला हाये शररबार है नफस्
मुद्दत हुई है सैरे चिरागा किये हुये

निश्वास दाहक उष्ण हे, ठिणगी उडे श्वासांतुनी
केली तदा दीपावली मी प्राणज्योती लाउनी
श्वास-निश्वासें तसे त्या लाविले रात्रीं दिवे
आज संधी ये, करूं नवरात्रिची ही रोशनी

फिर् पुर्सिशे जराहते दिल् कों चला है इष्क
सामाने सद् हजार नमकदां किये हुये

प्रेम करिते चौकशी कां भग्न हृदयाची पुन्हा?
फेडिले जे रक्तदानें आठवाया त्या ऋणा
मीठ घेउनि आसवें डोळ्यांत येती दाटुनी
पुसतां न प्रीती ही करी जखमेवरी की शिंपणी



वा हम्दीगर हुये हैं दिलो दीदा फिर् रकीब्
नज्जारा व खियाल का सामाँ किये हुये

लागली आता प्रिये नैनां-मनातें ओढणी
डोळे परस्पर दर्शना ईर्षा धरी मन चिंतनी
खेळती प्रतिद्वंद्व डोळे भंगल्या हृदयासवे
मंदिकेची पाउले ती झेलती आधी कुणी!

दिल् फिर् तवाफे कूये मलामत को जाये हैं
पिंदारका सनम्कदा वीराँ किये हुये

मानमंदिर हें असें वैराण करुनी वंचना
लोटांगणी काळीज माझें मोहयात्रेला निघे
अवमान हृदया आवडे, कटु बोल ते सहदापरी
ती दंशिता मधुमक्षिका लोलंगते अवहेलनी

फिर शौक कर रहा है खरीदार की तलब्
अर्जे मताए अक्लो दिलो जाँ किये हुये

माझी रसिकता आग्रहें त्या ग्राहकाला आर्जवी
कोपल्या प्रीतिग्रहाची वक्रदृष्टी वेधुनी
मांडिले हाटांत हृदया प्राण बुद्धी विक्रया
माल कोणीही लुटावा देय मूल्यावाचुनी

दौडे है फिर् हर इक गुलोलाला पर खियाल्
सद् गुलसितां निगाह का सामाँ किये हुये

उद्यान तें तेव्हा उद्याचे, आज ये उद्यान ते
कल्पिता अहिपुष्प मोहक ते गुलाबी ताटवे
डोळ्यांत आणुनि जीव हा भृंगापरी दृष्टी फिरे
काट्यांतल्या अर्ध्याखुल्या त्या लाजऱ्या जाईतुनी

फिर चाहता हूं नामए दिल्दार खोलना
जाँ नज्रे दिल फरेबिए उनवा किये हुये

प्रेमपत्रें मी तिची उघडून वाचावी पुन्हा
हस्ताक्षरें ती कापरी अन् नागमोडी मायना
लिहितां हले नख-रक्तिमा, स्पर्शें सुखावी लेखणी
बोटें धरावी ती उराशी जीव हा ओवाळुनी.



मांगे है फिर् किसी को लबे बाम पर हवस्
जुल्फे सियाह रुखपे परेशाँ किये हुये

छळतात मेल्या छेडुनी गालावरी उडुनी बटा
चाटीत जिभल्या त्या जणूं डसतात काळ्या नागिणी
ती कृष्णकुंतल कामिनी सज्जावरी यावी पुन्हा
गालीं गुलाबाची छटा, रागांतली अनुरागिणी!

चाहे है फिर् किसीको मुकाबिलमें आरजू
सुर्मेसे तेज दश्नये मिजगाँ किये हुये

लांब टोकें पापण्यांचीं वाकडे खंजीर ते
माखुनी सुर्मा दुधारी त्या दिले पाणी नवे
घेऊनी खंजीर ते हृदयावरी या रोखुनी
यावा समोरी तो पुन्हां निर्दावला माझा खुनी!

एक नौबहारे नाज को ताके है फिर् निगाह
चेहरा फरोगे मय्से गुलिस्ताँ किये हुये

धुंदीत मदिरेच्या खुले मीनामयी ती मायका
लावण्यलतिका यौवनीं सजली दिसे वासंतिका
लाजतो नच माज तो तारुण्य टोचित मोहवी
आसावले डोळे पुन्हा बघण्या सुवर्णाची खणी.

फिर जी मे है के दर्पे किसीके पडे रहें
सर् जेरे बारे मिन्नते दरबाँ किये हुये

डोकवें आशा कराया प्रीतिचा पहिला गुन्हा
पुसल्या न पुसल्या चाचपाच्या काळजाच्या त्या खुणा
आर्जवीनी द्वारपाला, रातबेराती पुन्हां
दारीं कुणाच्याही पडावे धुंद डोके टेकुनी

जी ढुंढता है फिर वही फुर्सत, के रातदिन
बैठे रहे तसव्वुरे जानाँ किये हुये

वेळ नाहीं ग रिकामा, सारखा कामांत मी
मिटताच डोळे वाटतें कांहीं कळावी बातमी
ध्यास लागावा तुझा रातंदिनी तव चिंतनीं
मोकळा तो वेळ आतां शोधितो मी साजणी

'गालिब' हमें न छेड के फिर जोशे अश्कसे
बैठे है हम् तहीयये तूफाँ किये हुये.

रमणी-सुखाची कल्पना रमणीय ती भरलीं मनीं
'गालिब' नको रे संयमें हृदयास लावूं टोचणी
टोचतां उठतील पाही आसवांची वादळे
छेडू नको आम्हांस सांगे हृदय हे आक्रंदुनी

— राजा बढे



**महाकवि बिहारी यांच्या काव्याचा**
**रसाळ, भावमधुर मराठी अनुवाद**

—राजा बढे

### कठपुतळी :

(परकीया नायिकेची दृष्टि इकडे तिकडे फिरत अखेर उपपतीवरच स्थिरावते, हें लक्षांत घेऊन सखी तिला म्हणते "तुझी दृष्टि सर्व सभाजनाना न्याहाळून पुढे जाते आणि परत मागे वळून त्याच व्यक्तींवर थांबते. कठपुतळी जशी थांबते न अगदी तशीच. त्यामुळें तो चित्तचोर अगदी अचूक ओळखतां येतो.)

**दृष्टीचे फुलपांखरू उडत फिरे भंवताल**
**परतुनि येत विसावते पसरीत मायाजाल**
**सभाजनी ती पाहते-परते तयासमोर**
**कठपुतळी परि थांबली-पाहुनिया मनचोर**

### अकालभोग :



(भूमिका-भ्रमराच्या रूपकानं कवि प्रणयासक्त जीवांना उपदेश करतो. "अजून जिला पराग आले नाही, रंग धरला नाही, रस भरला नाही अशा कलिकेवर आसक्त होऊन मूढा, भ्रमरा तिच्याभोवती फेर धरितोस. आजच ही कथा तर पुढे काय होणार हें दिसतंच आहे)

**नच फुलले सुमपरागही नच भरला मधुकोष**
**भ्रमर कळीवर भाळला, होय खुळा बेहोष**
**उलली ना ती पाकळी थरथरते मृदु काय**
**मिठी सुटना आज ही पुढे कळे ना काय!**

### स्नातमंगला :



(नायिकेच्या प्रणयलीलेचं सखी सखीजवळ वर्ण[redacted]"ती कंजनयनी राधिका न्हाऊन आपले केस सुकवीत उन्हांत बसली होती. केस सांवरण्याच्या मिषाने हळूच बोटांच्या फटींतून तिनं नंदकुमाराकडे पाहिलं...)

**स्नातमंगला राधिका कंजनयनि भयभीत**
**बसे उन्हांतच अंगणी घनकुंतल सुकवीत**
**करी बहाणा कामिनी सारित कचसंभार**
**करांगुलीतुनि पाहते हळूच नंदकुमार**

### रसमग्न :

कविची प्रास्ताविक उक्ति :

(संगीत काव्यरस आणि रमणी रतिरंग यांत सर्वस्वानें जे बुडले तेच खरोखर तरले आणि जे यांत बुडले नाहीत वरवरच तरले ते खरोखरच बुडले.)

**सरस रागसंगीत तें तंत्री नादतरंग**
**रसिता कविता कामिनी अनुरागी रतिरंग**
**पुनवेची रसकौमुदि चंद्रकलेचा संग**
**सर्वांगी बुडतां तरे, बुडा[illegible] न भिजता अंग**

# र स ली ना

**उजागर**

मंद चालता हंसगामिनी कानीं कुंडल झुके
हळूंच छेडित गाल गुलाबी घेइ सारखे मुके

**अभिलाषा**

बालपणीचा काल सुखाचा आठवतो घडिघडी
रम्य ती गोड सुखाची घडी
लहान असतां जो तो येउनि घेइ माझा मुका
आज त्या गमती साऱ्या चुका
शीलभंग हा आज अनीती–असा गुलाबी गुन्हा
वाटते लहान व्हावे पुन्हा

**अकालमर्दन**

मधुमालतिची कळी कोवळी, ओलवि तिजसी ओस
उलली नच रे पराग फुलले भरला नच मधुकोष
मरंद प्याया होसि उतावि‌ळ, उचित न लंपट भ्रमरा
चुरगाळुनि पाकळी निष्ठुरा, चुंबिसि नाजुक अधरा

**विनयभंग**

न्हात असे शामला, नितंबा होई कुंतलस्पर्श
मिळता संधी अशी मोकळी, मनि मावेना हर्ष
विनयभंग अपराधच घडतां–बंधन तें अनिवार
स्नान संपता अश्रु गाळतो हताश कचसंभार

**जलक्रीडा**

विहार करिता जलीं कामिनी उरीं मोडती लाटा
जळांतळीं कुठली करबंदी, मिळति मोकळचा वाटा
घेउनि डुबकी दे आलिंगन नच होई बोभाटा
जलवंतीची नजर तरळती फुलून आला काटा

नाही. पतौडीसारखा उमदा, सुशिक्षित, सुसंस्कृत आणि गुणी कप्तान आपल्याला लाभलेला असतांना त्याच्याविषयी शंकेचे वातावरण असणे भारतीय क्रिकेटच्या दृष्टीने बरे नाही. सध्याच्या निवड-समितीवरही माझा नितांत विश्वास आहे. त्यातले बहुसंख्य सभासद टेस्ट खेळलेले खेळाडु आहेत. त्यांनी ह्यांत लक्ष घालून असे प्रकार थांबवण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. त्याचप्रमाणे खेळाडु शारिरीक दृष्ट्या पूर्णपणे समर्थ असेल तरच आणि तेंव्हाच त्याला संघात घेतले जावे. न्यूझीलंडविरुद्ध असा एक प्रकार घडला आहे की खेळाडु बरा झालेला नसतानाही त्याला संघांत घेण्यात आलेच. त्याशिवाय खुद्द निवडीबाबत एकदोन मतभेदाचे मुद्दे सांगता येतीलही. परंतु सर्वसाधारणपणे कप्तान व निवडीचे सदस्य हे सध्या धोरणी आणि महत्त्वाकांक्षी आहेत हे खास.

कुठल्याही दौऱ्यात थोडे 'कडु-गोड' असायचेच. विजय झाला हे जसं गोड झाले तसे विजय मांजरेकरचे निवृत्तीचे 'प्रकरण' कडवट झाले. कुठल्याही खेळाडूच्या अनुपस्थितीमुळे संघाचे अडत नाही हे कुणीही कबूल करील. कारण तसे नसते तर आजवर टेस्टचे सामनेच अव्याहतपणे झाले नसते. परंतु हजारे, मन्कड, यासारख्या खेळाडूवर झालेले अन्याय शेवटचेच ठरले असे वाटत होते. त्यात भर पडणार नाही असे वाटत असतानाच पूर्वीचेच धरसोडीचे अदूरदर्शी धोरण अजूनहि चालूच आहे हे पाहून आश्चर्य व्यक्त करावेच लागते. तरुणांना संधि देण्याच्या स्तुत्य उपक्रमात जे आजही जुने भरात आहेत त्यांना वगळण्याचे खरोखरी काही कारण नाही. कुठल्याही परिस्थितीत देशाचा सर्वोत्कृष्ट संघ खेळला जावा हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवला तर तिथे वयाचे बंधारे आड येणार नाहीत. येऊ नयेतही !

न्यूझीलंड संघाने भारताचा आत्मसंतुष्टतेचा फुगा फोडला आहे. आपणास हल्ली फास्ट बोलींग चांगली खेळता येते हाच तो खोटया समाधानाचा फुगा! त्याचप्रमाणे उत्कृष्ट आघाडी फलंदाजांचा आणि गोलंदाजांचा अभाव असतानाही आपण आत्तापर्यंत काही सामने जिंकले खरे. पण पुढे तसे करून चालणार नाही. आपल्या न्यूनांची योग्य दखल आपण वेळीच घेतली पाहिजे, आणि सध्याचे अवगुण घालवण्याचा यत्न केला पाहिजे. भारतीय फलंदाजींतील व मंदगती गोलंदाजींतील मर्यादा उघड्या पाडण्याचे दृष्टीने न्यूझीलंड दौऱ्याचा आपणास फार चांगला उपयोग झाला आहे हे मान्य करावेच लागेल.

राघवन्‌चा नवा शोध ही न्यूझीलंड दौऱ्याची मोठीच देणगी म्हणावी लागते. परंतु नाडकर्णी, दुराणी व चंद्रशेखर ह्यांचा कस थोडासा झिजला असताना एकट्या राघवनची त्यात भर पडावी ही गोष्ट भारताच्या मंदगति गोलंदाजीची शक्ति कमी झाली हे दर्शवते की जास्त झाली हे दर्शवते ? सारांश, टेस्ट मालिकेचा ह्यावेळी चोथा झाला नाही हे बरे झाले. जुन्या दौऱ्यांच्यावर ताण करून हा दौरा सर्वसामान्यांना मनोरंजक वाटला आणि भारतीय क्रिकेटविषयी आस्था बाळगणाऱ्यांना तो उद्‌बोधकही वाटला, हे सर्वात चांगले झाले असे म्हणावेसे वाटते. ●●●



# रसलीना

## छायास्पर्श

(प्रसंग—नायकाला बघताच नायिकेनें केलेले प्रेमदर्शक हावभाव व चेष्टिते पाहून नायक मोहीत झाला आहे. तो स्वगत म्हणतो.

ओढणी बाजूला सारून तिनं डोळ्याला डोळा भिडविला, आणि लालस नजरेनं माझ्याकडे पाह्यलं, आणि क्षणांत माझ्या पावलावर आपली छाया पाडून वंदन करून निघून गेली.)

पदर सारुनी पाहतो लोचन लालस धीट
जाता स्पर्शित पाउले पडछायेनें नीट

## विरल वसना

(प्रसंग :— विरल वसनांतून फुटून बाहेर पडणारी नायिकेची तनुकांति पाहून नायक मोहित होतो. तो स्वगत म्हणतो.

अहाहा ! हिच्या ह्या श्वेत विरल वसनांतून ओसंडून येणारी सुंदर देहकांति विलसते आहे. जणुं काय कल्पवृक्षाची सपल्लव डहाळच समुद्रांत जलक्रीडा करीत आहे.

'विरल वसन, तनुकांति ती झिलमिल झळके अंग
सुरतरुपल्लव — डोलवी मानससिंधुतरंग

## जलक्रीडा

(भूमिका) जलक्रीडा करीत असलेल्या नायिकेकडे दूति नायकाचं लक्ष वेधते. व तिच्या अंगप्रत्यंगाचं व गौरवर्णाचं कौतुक करिते.

ती बघा ती सुवर्ण हंसी जलक्रीडा करते आहे. ज्या ज्या बाजूला ती डुबकी घेते तिथलं तिथलं सरितेचं पाणी तिच्या अंगकांतिमुळं केशरी रंगाचं भासतं.

जलकेलि करी सरितेत सखी कलती जल कापित जात जशी
उरि कुंभ तरंगवि काय बरी लहरीवर वाहत घेइ उशी
चुबके जल पाठपन्हाळ भरे तरि घे डुबकी वळवीत कुशी
वलयांतुनि ये वर कंजमुखी उडवीत तुषार मिलिंद जशी
कच कुंतल गुंफियले सलिली सलिली जल बिंदुसरातुनि मोतिलरी
तनु कांतिप्रभा जल गौरविते सरिता जणु केशरी रंगवरी.

—राजा बढे